Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- IX | ISSUE- IV | APRIL | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजूरांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास

डॉ. मनिष कान्हा चव्हाण
इतिहास विभाग
जवाहरलाल नेहरु कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर

गोषवारा

*कृषी क्षेत्रामध्ये काम करणारा शेतमजूर हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्वपूर्ण घटक आहे. परंतु हा घटक विकासाच्या प्रक्रियेमध्ये दुर्लक्षित राहीला आहे. नियोजन मंडळाच्या मते, "शेतमजूरांचा प्रश्न म्हणजे नि:संदिग्ध आव्हानच आहे आणि या प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक करण्याची जबाबदारी संपूर्ण समाजावर आहे." भारतातील शेतमजूरांच्या प्रश्नावर दुसऱ्या एका ठिकाणी अभिप्राय देतांना नियोजन मंडळाने म्हटले आहे की, "शेतमजूरांचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेतील चिघळलेली एक जखम आहे." शेतमजूरांच्या प्रश्नासंदर्भात माजी राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी यांनी देखील मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, "भारतामधील शेतमजूरांचा प्रश्न हा धुमसणारा ज्वालामुखी आहे. हा ज्वालामुखी केव्हाही जागृत होऊन लाव्हा फेकू लागेल."*

*भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतमजूरांचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण जरी असले तरी कृषी उत्पादनामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभवणाऱ्या या घटकाची आर्थिक व सामाजिक स्थिती दयनीय व चिंताजनक आहे. भारतातील शेतमजूर ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये सर्वाधिक मागे, सर्वाधिक शोषित, सर्वाधिक उपेक्षित वर्ग आहे. शेतमजूरांच्या समस्या जोपर्यंत यशस्वीपणे सोडविल्या जात नाहीत तोपर्यंत कृषी क्षेत्रात वास्तविक आणि कायमस्वरुपी सुधारणा होऊ शकणार नाहीत.*

*बिजशब्द :– शेती क्षेत्र, मजूरी, योजना, अर्थव्यवस्था.*

## प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे, २१ व्या शतकाच्या सुरुवातीला भारताची अर्थव्यवस्था पूर्णपणे शेती क्षेत्रावर अवलंबून होती. आजही शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १४ टक्के आहे. तसेच ६८.७ टक्के लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती क्षेत्र आहे. शेती क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या अवलंबून असण्याचे कारण म्हणजे छोटे शेतकरी आणि शेतमजूरांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेत असलेले स्थान होय. प्रत्येक कुटूंबाकडे असलेल्या जमिनीचे सरासरी प्रमाण एक एकर पेक्षा कमी आहे. म्हणजेच भारतीय शेती अनार्थिक तुकड्यामध्ये विखुरलेली आहे.

भारतातील भूमिहीन शेतमजूरांबरोबर वेठबिगार मजूरांसारखा व्यवहार केला जातो. भारतामध्ये वेठबिगारीची प्रथा खूप वर्षापासून चालत आली आहे. भूमिहीन शेतमजूरांना शेती हंगामामध्येच मजूरी मिळत असल्याकारणाने इतर वेळी बेकार राहावे लागते. बेकारीच्या काळातील खर्च भागविण्यासाठी तसेच विवाह सण.समारंभ, आजारपण यासाठी खाजगी सावकाराकडून कर्ज काढावे लागते. या कर्जासाठी तारण म्हणून त्यांच्याकडे स्वत:च्या श्रमाशिवाय इतर काहीही नसते. त्यामुळे खाजगी सावकार त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करतो, भूमिहीन शेतमजूरांची मजूरी एवढी अल्प असते की, त्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नाही. त्यामुळे वेळेनुसार कर्जाचा भार वाढत जातो. वास्तविकपणे कर्जाचा व्याजदर इतका जास्त असतो की, कर्जाची परतफेड करण्यासाठी त्या शेतमजूरांच्या अनेक पिढ्यांपर्यंत काम करावे लागते. त्यामुळे कर्जबाजारी भूमिहीन शेतमजूरांना गुलामगिरीमध्ये जीवन जगावे लागते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजूरांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजूरांच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

भूमिहीन शेतमजूर कोण?

जनगणना रिपोर्ट (१९६१) यांच्या मते, सन १९६१ च्या जनगणना अहवालानुसार भूमिहीन शेतमजूर म्हणजे असे मजूर की जे दुसऱ्याच्या शेतावर काम करतात. त्यांना कामाच्या बदल्यात पैसा आणि वस्तूंच्या स्वरुपात मोबदला दिला जातो अशा मजूरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात. राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोग (१९८७) यांच्या मते, राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोगाच्या अहवालानुसार भूमिहीन शेतमजूर म्हणजे असे शेतमजूर की, जे मुळात अकुशल व असंघटीत असून त्यांच्याकडे जीवन जगण्यासाठी श्रमाच्या व्यतिरिक्त दुसरे काहीच नसते. त्यांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात. पहिली शेतमजूर चौकशी समिती (१९५०.५१) यांच्या मते, पहिल्या शेतमजूर चौकशी समितीच्या अहवालानुसार 'शेतमजूर म्हणजे असे मजूर की, जे मजूरीसाठी शेतीमध्ये पिकांच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये सहभागी होतात. तसेच त्यांना अर्ध्या वर्षापेक्षा जास्त काळापर्यंत दुसऱ्याच्या शेतीमध्ये काम करावे लागते.

भूमिहिन शेतमजूरांसाठी असलेल्या विविध योजना

सन २००५ मध्ये शेती व लाकुडतोड, जंगल संवर्धन आणि मासेमारी अशा इतर संबंधीत व्यवसायांचा भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये १८.६ टक्के इतका वाटा होता, आणि या व्यवसायांमध्ये एकूण कामगारांपैकी ६० टक्के लोक काम करत होते. वार्षिक सकल उत्पन्नामधील शेतीचा वाटा सतत घटत आहे, परंतु अजूनही शेती हाच अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा घटक आहे. असे असले तरी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लहान शेतकऱ्याची व भूमिहीन शेतमजूरांची परिस्थिती इतर क्षेत्रातील कामगारांच्या तुलनेत खालावलेली आहे. भूमिहीन शेतमजूरांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती पुढीलप्रमाणे,

१) कृषी श्रमिक सामाजिक सुरक्षा योजना :.

शेतमजूरांना सुरक्षा देण्यासाठी १ जुलै २००१ रोजी श्रम मंत्रालयामार्फत ही योजना सुरु करण्यात आली. शेतमजूरांना नैसर्गिक मृत्यूसाठी २०,००० रु. तर अपघाती मृत्यूसाठी ५०,००० रु. या योजनेअंतर्गत देण्यात येतात.

२) आम आदमी बीमा योजना :.

ग्रामीण भागातील भूमिहीन व्यक्तीला बीमा प्रदान करण्यासाठी २ ऑक्टोबर २००७ पासून ही योजना सुरु करण्यात आली. बीम्याचा प्रिमीयम ५० टक्के केंद्र सरकार तर ५० टक्के राज्य सरकार भरते. भूमिहीन व्यक्तीला अपघाती ७०,००० रुपयांची मदत किंवा ३७,५०० रुपये मदत केली जाते.

३)कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजना :.

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून भूमिहीन शेतमजूरांसाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमानी व सबलीकरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शासनाकडून जमीन खरेदी करुन ती भूमिहीन अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटूंबाच्या पती.पत्नीच्या नावे केली जाते. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमीन त्यांच्या नावे केली जाते.

या प्रवर्गातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटूंबाला चार एकर कोरडवाहू जमीन किंवा दोन एकर बागायती जमीन उपलब्ध करुन देण्यात येते. जमीन खरेदीसाठी येणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्ज व ५० टक्के रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येते.

४) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना :.

ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूरांना रोजगार मिळवून देण्यासाठी १५ ऑगस्ट १९८३ पासून ही योजना चालु करण्यात आली आहे.

५) जवाहर रोजगार योजना :.

१ एप्रिल १९८९ रोजी ही योजना सुरु करण्यात आली. ग्रामीण भागात मजूरी रोजगार पुरविणारी पहिली मोठी योजना म्हणून या योगजनेकडे बघितले जाते.

६) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना :.

२ फेब्रुवारी २००६ पासून राष्ट्रीय रोजगार हमी योजना राबविण्यात आली. २ ऑक्टोबर २००९ रोजी या योजनेला महात्मा गांधीचे नाव देण्यात आले.

७) रोजगार आश्वासक योजना :.

केंद्र आणि राज्याचा अनुक्रमे ७५ : २५ टक्के वाटा असणारी आणि मजूरीचे आश्वासन देणारी ही योजना २ ऑक्टोबर १९९३ मध्ये सुरु करण्यात आली.

महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची विभागनिहाय संख्या (लक्ष)

| अ. क्र. | विभाग | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | १२८७१०८ | ६७७२६२ | ८७०५८६ |
| २ | नाशिक | २१२५५१० | ३२४९१०२ | ३०९४१२३ |
| ३ | पुणे विभाग | २३९७६२६ | १७३४०५४ | १८२६७५७ |
| ४ | औरंगाबाद विभाग | २१७८७७९ | २३०१८१५ | २९६३९२० |
| ५ | नागपूर विभाग | ११७२०२२ | १६१७४५० | २०२११५० |
| ६ | अमरावती विभाग | १०११०५३ | २१३५५७९ | २७०९६०४ |
| महाराष्ट्र | | १०१७२१०८ | १०८१५२६२ | १३४८६१४० |

**Source:-** Registrar General and Census Commissioner India.

महाराष्ट्रातील विभागनिहाय भूमिहीन शेतमजूरांच्या संख्येची माहिती दर्शविण्यात आली आहे. सन १९९१ मध्ये कोकण विभागामध्ये १२ लाख ८७ हजार एवढे भूमिहीन शेतमजूर होते ते सन २०११ मध्ये ८ लाख ७० हजार एवढे कमी झाले. तसेच नाशिक विभागामध्ये सन १९९१ मध्ये २१ लाख २५ हजार एवढे भूमिहीन शेतमजूर होते त्यात सन २०११ मध्ये ३० लाख ९४ हजार एवढी वाढ झाली. तर पुणे विभागामध्ये सन १९९१ मध्ये २३ लाख ९७ हजार एवढे भूमिहीन शेतमजूर होते. ते सन २०११ मध्ये १८ लाख २६ हजार एवढे कमी झाले. औरंगाबाद विभागामध्ये सन १९९१ मध्ये २१ लाख ७८ हजार एवढी भूमिहीन शेतमजूरांची संख्या होती. ती सन २०११ मध्ये २९ लाख ६३ हजार एवढी वाढली. नागपूर विभागामध्ये सन १९९१ मध्ये ११ लाख ७२ हजार एवढे भूमिहीन शेतमजूर होते ते सन २०११ मध्ये २० लाख २१ हजार एवढे वाढले. तर अमरावती विभागामध्ये सन १९९१ मध्ये १० लाख एवढी भूमिहीन शेतमजूरांची संख्या होती. त्यामध्ये २०११ मध्ये २७ लाख ९ हजार एवढी वाढ झाली.

महाराष्ट्र राज्यामध्ये सन १९९१ मध्ये १ कोटी १७ लाख भूमिहीन शेतमजूरांची संख्या होती ती सन २०११ मध्ये १ कोटी ३४ लाख एवढी वाढली. यावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्रामध्ये भूमिहीन शेतमजूरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे.

सारांश

भूमिहीन शेतमजूरांसाठी विविध योजना राबविण्याचा सरकारचा मुख्य उद्देश म्हणजे शहरी व ग्रामिण भागातील बेरोजगाराचे प्रमाण कमी करणे हा आहे. त्यामुळे शहरी व ग्रामिण भागातील लोकांना या योजनेमुळे रोजगार मिळवून देणे हा आहे. तसेच विविध योजनेचा लाभ शहरी व ग्रामिण लोकांना मिळून त्यांच्या जीवनात योजनेच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक स्थैर्य निर्माण करणे आहे.

ग्रामीण भागात रोजगार निर्मितीची अपूर्ण व्यवस्था असल्यामुळे शेतमजूरांचे शेतीवरील अवलंबित्व वाढून आर्थिक स्थिती उत्तरोत्तर वाढत गेल्याचे दिसते. औद्योगिक आणि कृषी मजूरांच्या तुलनात्मक स्थितीविषयी असे म्हणता येईल की, औद्योगिक मजूरांच्या प्रश्नाकडे ज्या प्रमाणात लक्ष देण्यात आले त्या प्रमाणात भूमिहीन शेतमजूरांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यात आले नाही.

संदर्भसूची

१) आचार्य अनुराधा, ‘स्वांतत्र्योत्तर काळातील शेतमजूर’ योजना मासिक, अंक १२ वा, २६ जाने. १९७५, योजना कार्यालय, मुंबई.
२) देशपांडे स. ह., ‘नवी शेती तंत्र आणि शेतमजूर’, योजना मासिक, अंक १२ वा, २६ जाने. १९७५, योजना कार्यालय, मुंबई.
३) सोळूंके आर. एस. ‘महाराष्ट्राची अर्थव्यवस्था’, कौमास पब्लीकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, तृतीयावृत्ती, २००३.
४) घाटोळे रा. ना. ‘समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पद्धती’, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २०००.
५) फडणवीस मृणलिनी, देशपांडे प्राची, ‘श्रम अर्थशास्त्र’, पिंपळापुरे ॲन्ड कं. नागपूर, २००२.

६) बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुळकर्णी मृणाल, 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४.

७) कुलकर्णी बी. डी., ढमढरे एस. व्ही., 'अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती', डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर, २००७.

८) रायकवार रविंद्र, 'साकोली तालुक्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन', एम. फिल. लघुशोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर, २००५.

9) Ahlawat S., ' Green Revolution and Agriculture Labourers', Deep and Deep Publication. New Delhi, 1998.

10) Chandee K. T., 'Libereting the Landless Agriculture Labour', Economic and Political Weekly, Vol. No. XLVI, 2012.

11) Jose A., 'Trends in Real wages rates of Agriculture Laboures', Economic and Political Weekly, Vol. 9, No. 13, 1974.